म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल वा.
दा. क्र. ११९५०

# हिमालय

...माराव निळकंठ ओक

IRBK-0111950
IRBK-0111950

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
नं. ७

विषय बालवाङ्मय
वा. नं. ९१.८०



# हिमालय

[illegible]

दा. क्र. ११८५०

# हि मा ल य

म. ग्रं. सं. ठाणें.
वा. ग्रा. ९७२
११८५०

लेखक

शामराव नीलकंठ ओक

म. ग्रं. सं. ठाणे.
दा. क्र. ११६५०
वाल वा.
IRBK-0111950
IRBK-0111950

— एकमेव वि
चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग
पुणें २.

किंमत दहा आणे

मुद्रक
एस्. व्ही. पोरे
चैतन्य प्रेस,
६९१ बुधवार,
पुणें २.
★

प्रकाशक
के. एस्. गुप्ते
६९१ बुधवार,
पुणें २.
★

ग्रं.सं. ठाणे.
दि. ३१.५.१९०८


# हि मा ल य

असंख्य वर्षांपूर्वीं उत्तरेस एक अजस्र पर्वत समुद्रांतून निघाला. सध्यांच्या गंगासिंधूंच्या खोऱ्यांवर प्रथम जो समुद्र होता; त्याच्या तळाची भूमी भूकंपानें वर आली, व ईशान्येच्या तिबेट पठाराला नेट देऊं लागली; त्यामुळें भूमीला ज्या चुण्या पडल्या त्याच हिमालयाच्या रांगा. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत या अर्धवलयावर नगराजींनीं उत्तरेच्या बाजूस जंबुद्वीपाला एक छत्रच निर्माण केलें. तीन चार हजार मैलांच्या त्या अखंड रांगा लगेच नवें भरतखंड तयार करण्याच्या कामाला लागल्या. उत्तरेकडचा समुद्र पश्चिमेकडून हिंदी

महासागराला मिळाला होता; व त्यानेंच जंबुद्वीपापासून आफ्रिका खंडाची ताटातूट केली होती. नैर्ऋत्येकडे आशा अफाट पसरलेल्या या जलाशयानें जे बाष्पमेघ पाठवले त्यांना आडवून त्यांचा जलसंचय भरतखंडाला देण्याचें काम उत्तरे-कडच्या या नव्या पर्वतेश्वरानें सुरूं केलें. तेव्हांपासूनच हिमा-लयानें आपल्या पालनपोषणाला सुरुवात केली. जुन्या जंबु-द्वीपावरचे निलगिरी, सह्याद्रि; विंध्य आदि पर्वत हिमालया-पेक्षां वयानें वडील खरे, पण त्यांचा परिवारसुद्धां या नवीन अवतरलेल्या नगराधिराजानें आपल्या कुटुंबांत सामील करून घेतला !

हिंदी महासागरावरून हिमालयाकडे धांव घेणारे मन्सूनचे पाणाळ ढग आपला थेंब नी थेंब त्याच्यापुढें मोजून देतात. स्वतःच्या अखंड हिमकवचाला जरूर तितकें पाणी ठेवून हिमालय बाकीचें पाणी असंख्य नद्यांनीं दक्षिणेकडे सोडून देतो. गंगा-सिंधूंच्या या प्रवाहसमूहानें सिंध, पंजाब, संयुक्त-प्रांत, बिहार, बंगाल; व आसाम ही नवी सुवर्णभूमी तयार केली. पण हिमालयामुळें पाऊस मिळतो तो केवळ विंध्य-पर्वताच्या उत्तरेकडील या नव्या प्रदेशालाच नव्हे; आतां द्वीपाचें द्वीपकल्प बनलेल्या दख्खन-माळव्याच्या पठारालाहि हिमालयानें पावसाची कायमची तरतूद करून दिलेली आहे; हिमालयानें जर दक्षिण-पूर्वाभिमुख तटबंदी उभी करून पाठी मागचें मध्य आशियाचें वाळवंट कोरडे पाडलें नसतें, व

स्वतःकडे हिंदी महासागरावरच्या वाफाळ वाऱ्यांना खेचलें नसतें, तर पंचागांत लिहिल्याप्रमाणें ज्येष्ठ मासांत येऊन कार्तिकापर्यंत चाकरी देणारा आपला मोसमी पाऊस नुसता डोक्यावरून गेला असता. घाटमाथ्यापलीकडे पाऊस वळलाहि नसता कदाचित्.



आपल्या देशाला अर्ध्या भूमीची देणगी देणारा, आपल्या कृपेचें जीवन सिंचन करून लंकेपासून गांधार देशापर्यंत ती ती भूमी सदैव समृद्ध ठेवणारा, व कोट्यवधी भारतीयांचा पोषणकर्ता, असा हिमालय आपल्याला वंदनीय वाटतो. कारण तो आपलाच नव्हे, तर आपल्या असंख्य पिढ्यांच्या पितरांचाहि पिता आहे. पार्वती ही एक हिमालयाची लाडकी मुलगी होऊन गेली असेल, पण आपण सगळेंच हिमालयाचे पुत्र आहोत! आदिपुरुष हिमालयाची आम्ही प्रजा आहोंत.

खेळून खेळून दमलेलें एकादें मूल ज्याप्रमाणें आजोबाच्या अंगावर येऊन पडतें व झोपी जातें, त्याप्रमाणें जीवनाचा खेळ खेळून जीत किंवा हार याबद्दल पर्वाहि न करण्याइतकें जे थकतात, ते लोक हिमालयाची अंतिम शांति शोधितात. मैदानावरच्या जीवनकलहांतून निवृत्त होणारी हिमालयाची कित्येक लेकरें अखेर परत त्याच्या मांडीवर जाऊन लोळतात; म्हणूनच विरक्त–आसक्त, ज्ञानी–अज्ञानी, आशावादी-निराश, उदास–उल्हासी; भले–बुरे, शहाणे–वेडे, सात्विक–व वेळप्रसंगीं लुच्चेहि लोक हिमालयाचा आश्रय करून रहात असलेलें आढळतात.

'स्वर्गाच्या पायऱ्या हिमालयांत सुरू होतात.' ही जरी एक आपली धार्मिक कल्पना असली, तरी देवलोक मानण्याइतकें दिव्य स्वरूप हिमालयाला खास आहे. हिमालयावर देव असोत वा नसोत, स्वतः हिमालयच देव आहे. पृथ्वीवरील त्याचें सर्वश्रेष्ठ स्थान, त्याची अपरंपार शक्ति, एकपंचमांश मानव जातीचा तो लीलेनें करीत असलेला सांभाळ, त्याचें अमूप ऐश्वर्य इत्यादि गुणांनीं तो आपोआपच देवपदवीला पोहोंचला आहे. गंगा हें ज्याप्रमाणें आपल्या पवित्र भावनांचें प्रतीक, त्याप्रमाणें आपल्या उदात्त व भव्य कल्पनांचें मूर्त स्वरूप म्हणजे 'हिमालय.' तो न पाहतां देखील त्याची जाणीव प्रत्येक हिंदीवासीयाच्या हृदयांत सदैव असते, आणि प्रत्यक्ष पाहिला, म्हणजे तर तो कल्पनेच्या अवास्तव अपेक्षादेखील पुऱ्या करतो. !

मन्सूनच्यां पंखांनीं जर आपण हिमालयाच्या भेटीस गेलो तर पूर्वेच्या ब्रह्मदेशापासून वायव्येकडच्या बलुचिस्तानपर्यंत त्याचे बाहु आपल्या स्वागतार्थ पसरलेले आहेत. पूर्व समुद्रांतून निघालेल्या आराकान–तेनासरीम या दाक्षिणोत्तर रांगांनीं हिमालयाच्या विस्ताराला सुरवात होते. नंतर ब्रह्मपुत्रेच्या वळणापासून तो थेट सिंधूच्या मुरडीपर्यंत पंधराशें मैल लांब व दोनअडीचशें मैल रुंद असा मुख्य हिमालय पसरलेला आहे. तेहरी, गढवाल, कुमाऊ, उत्तराखंड व नेपाळ हे या हिमालयाचे चार प्रादेशिक विभाग आपल्याला शेंकडों वर्षें माहीत आहेत. तिबेट पठाराला खेटून पूर्वेकडून उत्तरेपर्यंत तरवारीसारखा बांक घेऊन हिमालय पश्चिमेकडे वळतो. काराकोरम, हिंदुकुश या पूर्वपश्चिम बाहुंनीं त्यानें हिंदुस्थानच्या उत्तरेचा कडेकोट बंदोबस्त केला आहे. हिंदुकुशाच्या रूपानें दाक्षिणेला उतरत सुलीमन, खिरथर व हाला या पायऱ्यांनीं हिमालय पश्चिम समुद्रांत जणूं काय सायंस्नानासाठीं उतरत गेला आहे. उत्तरायणांत सूर्य रोज उगवतीकडून मावळतीकडे खेपा घालीत असतो. तो केवळ आमच्या हिमालयाला प्रभावळ करण्यासाठींच असें आपल्याला वाटतें. याप्रमाणें ‘ पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य ’ अवघी उत्तर दिशा व्यापून बसलेला हिमालय हा पृथ्वीवरचा सर्वांत मोठा पर्वतसमुह आहे. त्याची एक संपूर्ण प्रदक्षिणा हवेंतून करूं म्हटलें तरी रोज एक हजार मैलांचा टप्पा करणाऱ्या विमानाला

त्याच्या शिखराकडे जाण्यासाठीं वाढत्या उंचीच्या तीन चार रांगा ओलांडाव्या लागतात. पहिली पांच सात हजार फुटांच्या आसपासची 'पाय टेकड्या'ची रांगच आपल्या सह्याद्रीहुन उंच आहे. थंड हवेसाठीं वसलेलीं 'हवा-खाऊ' ठिकाणें इतक्या उंचीवरच संतुष्ट आहेत. सिमला, मरी, मसुरी, नैनिताल, दार्जिलिंग वगैरेंची ही 'प्यादेरांग' सोडल्या-नंतर बारा तेरा हजार फूट उंचीच्या 'शिपाई रांगा' सुरूं होतात, पण बर्फाचा झगा पांघरण्याइतक्या योग्यतेला याहि पोहोंचलेल्या नसतात. पूर्वेकडे पंधरासोळा हजार फूट उंचीच्यावर व उत्तरेकडे सुमारें बारा हजारांवर बर्फ सुरूं होतें. या तिसऱ्या रांगापासून हिमाच्छादित शिखरें सुरूं होतात. ईशान्येकडे बर्फानें फुललेल्या दोन तीन राक्षसी रांगा ओलांडल्यानंतर आपण तीन मैल उंचीच्या तिबेट पठारावर उततों, तर उत्तरेकडे पामीरच्या पठारापर्यंत जाण्यास आपल्याला पीरपंजल, पंगी व झन्स्कर कशा गगनभेदी भिंती ओलांडून, मुझताघ—काराकोरमच्या अजस्र हिमतटाजवळून गिलगित—सिंधूच्या संगमाच्या बाजुबाजूनें मुंगीसारखी वाट शोधीत जावें लागतें. तिबेट आणि पामीर हीं हिमालयाचींच आंगणें आहेत; आणि काश्मीरचें नंदनवन ही आपल्याला हिमालयाचीच देणगी आहे.

मुख्य हिमालयाची सर्वसामान्य उंची समुद्रसपाटीपासून अठरा हजार फूट किंवा सुमारें साडेतीन मैल असल्यामुळें

भयानक पर्वतांचा तो विस्तार कायमचा बर्फाच्छादित असतो. या दोन तीन वरिष्ठ रांगांतच पंचवीस हजार फुटांचेवर–किंवा दर्यापेक्षां सुमारें साडेचार मैल उंच अशीं पन्नासांवर शिखरें आहेत. यूरोपांतल्या आल्प्सची कमाल उंची जिथें संपतें, तिथें हिमालयाची उंची सुरू होतें. त्या युरोपियन पर्वताच्या दुप्पट उंचीच्या आमच्या हिमालयापुढें अमेरिकेचा रॉकी–ॲन्डीजहि ठेंगणा ठरतो. हिमालयाच्या चढावर समुद्रसपाटीपासून तीन मैल उंचीपर्यंत माणसें वस्ती करून राहूं शकतात, त्याच उंचीवर मानससरोवर हें जगांतलें सर्वांत उंचावरचें तळें आहे.–आणि याच उंचीवर एक सोन्याची खाण देखील आहे. साडे तीन मैल उंचीवरून मुझताघ, सतलज, जनसंगाला असे घाटरस्ते हिंदुस्थानाबाहेर जातात;


परंतु हिमालयाचें खरें वैभव याहि उंचीच्यावर सुरू होतें. त्या गगनभेदी शिखरांच्या रांगाचें नुसतें आंकडेवार वर्णन देखील देवसभेच्या वर्णनासारखें वाटेल. गौरीशिखर ( उंची २९१४० फूट ) हें पृथ्वीच्या कवचाचें सर्वांत उंच टोंक आपण रास्तपणेंच पार्वतीपरमेश्वराचें अधिष्ठान मानलें आहे. त्यालाच कठोर वस्तुस्थितींत ‘ मौंट एवरेस्ट ’ हें नांव आहे. त्याच्याहून एकच हजार फूट कमी उंचीचीं दोन भव्य शिखरें हिमालयाच्या उत्तरेकडे आणि पूर्वेकडे आहेत. उत्तरेकडच्या दापसाँग, k 2 ऊर्फ माउंट गॉडविन ऑस्टेन (२८१९१ फूट ) भोंवतालीं तेवीस ते सत्तावीस हजार फूट

उंचीच्या चारपाच ' उपशिखरां 'चा परिवार आणि बारा हजार फुटांचा तट आहे, तर पूर्वेच्या ऐंशी मैलावरून दिसणाऱ्या कांचनगंगेच्या ( उंची २८२२५ ) सहवासाला एकीकडे गौरीशिखर तर दुसरीकडे कमेत, गुरुमाधाता, नंदादेवी, गोसाईस्थान व धवलागिरी ही पहिल्या प्रतीच्या शिखरांची त्रुटित रांग आहे.

उत्तरेकडेहि साडेचार पांच मैल आकाशांत घुसलेलीं शिखरें कांहीं कमी नाहींत; तिकडे पकालु, राकापुशी, तिरचामिर अशा भयानक पर्वतशृंगांनीं हिमालयानें उत्तर दिशा नटवली आहे. आणि इकडे अग्रशिखरांखेरीज कैलास त्रिशूल, मधुमल्हारी, जनसंग, बद्री-केदार अशा असंख्य हिरकण्यांनीं पूर्वदिशा शृंगारली आहे.

सृष्टींतला परम एकांत भोगीत राहणाऱ्या या आकाशभेदी शिखरांच्या समभेवर अविरत हिमवर्षाव चाललेला असतो. त्यांच्या डोक्याभोंवती सोंसाटणारीं भयानक वादळें हीच त्यांची जणुं भाषा. कल्पनातींत थंडी, सर्वत्र बर्फाचा खच, धांवत्या मेघांनीं व्यापलेल्या दिशा, अंतराळीचीं विजेनें भारलेलीं तुफानें-असें वातावरण म्हणजे तेथली नेहमींची हवा. पृथ्वीनें उघडलेल्या कराल दाढांसारख्या कड्यांमधून बर्फाच्या राशीं घळींत जमा होत असतात. या घळई मिळून मोठमोठ्या हिमनद्यांचीं तुलना ध्रुव प्रदेशांतील हिमनद्यांशीच होऊं शकेल. उत्तरेकडून सिंधूला पाणी देणारा अफाट हिम-

नदसमूह, नव्वद मैल लांबीचा बलतोरो हिमनद किंवा गौरीशिखरांजवळची रांगबक् हिमनदी, अशा अक्षय जलनिधींपासूनच खालीं जलनद्यांना जन्म मिळतो.



दिवसाला दोन पावलें पुढें सरकारणाऱ्या या असंख्य हिमनद्या उतरत उतरत समुद्रसपाटीपासून दोन मैल उंचीवर आल्या म्हणजे वितळतात; तेव्हां पर्वतांतून कोरून आणलेली त्याच्या पोटांतली खडी खालीं राहते. व स्वच्छ पाण्याचे प्रवाह उड्या घेत आपला समुद्राकडचा प्रवाह सुरूं करतात. हिमालयाचें हें स्फटिकासारखें अमृतजल गंगोत्री किंवा जम्नोत्रीच्या वर जाऊन एकदां तरी चाखावें व धन्य व्हावें, ही प्रत्येक हिंदूची आकांक्षा असल्यास नवल काय ?

मुख्य हिमालयाच्या मध्यापलीकडे, ईशान्येला कैलासाच्या पायथ्याशीं सतलज आणि ब्रह्मपुत्रा या जलनद्या मानस

सरोवरांतून जन्म घेतात. थोड्या उत्तरेकडे सिंधू उगम पावते सिंधू उत्तरेकडे साडेसातशें मैल वाहात जाऊन एकदम दक्षिणेकडे वळून हिंदुस्थानांत उतरते, तर तशीच पित्याला अर्ध प्रदक्षणा करून ब्रह्मपुत्रा पूर्वेकडून हिंदुस्थानांत उतरते; पण अधीर सतलज मात्र मधेंच पश्चिमेकडे मुसंडी मारून सोळा हजार फुटांच्या दरडींतून हिंदुस्तानांत उडी घेते! हिमालयानें अनेक अमृतगंगांना जन्म दिले, इतकेंच नव्हे तर आपल्या या सर्व कन्यकांचे संसारहि त्यानें कायमचे सजवून दिले आहेत. सहासहामाशीं पाणी असणाऱ्या आमच्या सह्याद्रीच्या गरीब मुलींच्या इतकी हलाखी हिमकन्यांना कधींच दिसायची नाहीं.

तथापि हिमालयावरचा साराच हिमवर्षाव सुरळीतपणें नद्यांतून वाहून जातो असें नाहीं. कित्येकदां बर्फाचे मोठमोठे कडे कोसळतात. आणि ते उताराला लागल्यावर त्यांच्या वाटेंतले सुळके, खडक, हिमखंड व हिमसंचय गोळा होत होत एक राक्षसी हिमलाट खालीं येते. तिच्या मार्गांत सांपडणारी एकादी मनुष्यवस्तीची वाडीची वाडीच एकादे वेळीं गडप होते, व माणसांसारखे क्षुद्र जीव तर पन्नासपन्नास फूट खोल बर्फांत गाढले जातात!

अनादिकालापासून आपले लोक हिमालयाच्या यात्रा करीत आले आहेत. कैलासदर्शन आणि मानसस्नान हे अनुभव कालिदासापासून आजवर कैक रासिक भाविकांनीं

घेतले असतील; पण एक पर्वत या वास्तव दृष्टीनें हिमाल-याकडे पाहून, मनुष्यजातीच्या शास्त्रीय ज्ञानांत भर घालण्यासाठीं कोणी हिंदी माणूस स्वयंस्फूर्तीनें हिमालयाची पहाणी व मोजणी करण्याच्या भानगडींत पडला, असें निदान कागदोपत्रीं तरी नमूद नाहीं. कैलास–मानसाकडे केवळ धार्मिक भावनेनें खेपा घालीत असतां देखील वस्तु-स्थितीची नोंद करणें आपल्या भक्तिमार्गी यात्रेकरूंना कठिण नव्हतें; परंतु कर्ममार्गानें हिमालयाकडे जाण्याचा मान पर-कीयांना मिळायचा होता. ता. ९ नोव्हेंबर इ. स. १७१५ रोजीं जेजुइट मिशनरी देसी या पहिल्या युरोपियनानें कैलास पर्वताचें दर्शन घेतले. तेव्हांपासून धर्मप्रसार, संशोधन किंवा नुसतेंच साहस अशा प्रेरणांनीं पाश्चत्यांचीं एक अखंड रांगच हिमालयाकडे निघाली. गेल्या दोनशें वर्षांत कोणी चीन-मार्गें तर कोणी हिंदुस्थानांतून एकसारखे हिमालयाकडे जात राहिले. बेलीगाती, रेगी, रिटर, हम्बोल्ट, स्वेन हेदिन अशा अनेक विलायती प्रवाशांनीं हिमालयाची जगाला बरीच माहिती करून दिली आहे.


१८६५ सालीं ब्रिटिश अंमलदारांच्या मदतीनें नयनसिंग नांवाचा एक पंडित, आधुनिक मापनयंत्रें घेऊन खाटमांडूहून पायीं निघाला; तिबेटांत ल्हासापर्यंत जाऊन तेथून ब्रह्मपुत्रे-च्या कांठानें मानससरोवरापर्यंत पहाणी करून, तो निघा-ल्यापासून सहा महिन्यांनीं परत आला. दुसऱ्या खेपेस

१८७३ मध्यें नयनसिंगानें बऱ्याच उत्तरेकडे हिमालय ओलांडून, लेहपासून ल्हासापर्यंत सफर केली व तेथून तो कलकत्यास आला. त्या दिवसांत नयनसिंग व इतर कांहीं प्रवासी पंडित यांनीं हिमालयाच्या नकाशासाठीं महत्वाची सामुग्री मिळवली. तीस वर्षानंतर स्वेन होदिननें आपल्या सुप्रसिद्ध सफरी करून नयनसिंगाच्या नकाशांतील बारीक बारीक चुका दुरुस्त केल्या.

ब्रिटिश लोकांनीं त्रिकोणमिति–पद्धतीनें हिंदुस्थानाची मोजणी ( सर्व्हे ) सुरू केली; तेव्हां कॉनवे, हूवर इत्यादि अधिकाऱ्यांनीं हिमालयाच्या शिखरांची लोकांना आणखी माहिती पुरवली. १९०४ सालीं शिपाईगिरी करून ल्हासाला जाऊन आलेले सर फ्रान्सिस यंग हस्बण्ड यांनींहि हिमालयाच्या वैभवाचें भांडार जगाच्या नजरेला आणलें. आणि ड्यूक ऑफ ॲब्रुझीसारखे दूरदूरचे उत्साही लोक इकडे येऊन त्यांनीं हिमालय चढण्याचे प्रयत्न सुरू केलें. नऊ सालीं या इटालियन ड्यूकनें ‘ केतू ’ शिखरावर २४,६०० फुटापर्यंत आरोहण केलें त्यानंतर ममरी नांवाचा मनुष्य काश्मीर दरीतून नंगापर्वत ( २६६२९ ) या निर्घृण शिखराकडे जाण्याच्या प्रयत्नांत जिवाला मुकला. तसें केवळ ईर्षेनें शिखरें गांठण्यास निघालेलें कित्येकजण आजवर प्राणास मुकले आहेत, पण हिमालयाचीं टोकें पादाक्रांत करण्याची मनुष्याची खटपट थांबली नाहीं.

दरवर्षी दोन वर्षाआड एखादी हिम्मतबहाद्दराची टोळी प्राणाची पर्वा न करतां कोणत्या ना कोणत्या शिखरावर पोहोंचण्यासाठीं धडपडत असते. असल्या मोहिमांना गेल्या २५–३० वर्षांत बरेचसें पद्धतशीर स्वरूप आलें; व पंचवीस हजारांवर उंचीच्या पहिल्या प्रतीच्या दोन शिखरांवर मनुष्य प्राण्यानें काठी रोवली. एकतीस सालीं स्मिथनें ( F. S. Smythe ) 'कमेत'चें टोंक गांठलें, व ३४ सालीं टिलमन् व ओडेल हे नंदादेवीच्या शिखरावर उभे राहिले. याखेरीज त्रिशूल, जनसंग अशा दुय्यम वर्गाच्या अनेक शिखरांवर वेगवेगळ्या हौशी प्रवाश्यांनीं आरोहण केलेंच आहे. जनसंग शिखराकडे २०,००० फुटांपर्यंत चढून गेलेला शरश्चंद्र दास हा एकच हिंदुस्थानी मनुष्य हिमालयारोहणाबद्दल प्रसिद्ध आहे.

१९३४ मध्यें डॉ. पॉल बॉएर याच्या नेतृत्वाखालीं बव्हेरियन जर्मनांच्या एका तुकडीनें कांचन–गंगेवर हल्ला चढवला; तथापि 'सिनिअलचु' या पृथ्वीवरील सर्वांत सुंदर पर्वताची संपूर्ण व नोंद याच जर्मन तुकडीने केली. १९३७ सालीं पुन्हां जर्मनांची दुसरी एक टोळी नंगापर्वत चढण्यासाठीं आली, पण त्यांच्या या मोहिमेवर भयंकरच प्रसंग ओढवला. एक सबंध टोळीच्या टोळी एका अजस्र हिमलाटेखालीं सांपडली, सात जर्मन व नऊ हिंदी लोक जिवाला मुकले. या वेळींच डॉ. बॉयर जर्मनीहून विमानानें टप्पे करीत



गिलगितपर्यंत आला, तथून आपल्या संवगड्यांचा मार्ग काढीत एकटा हिमालयांत शिरला, व अखेर पांच जणांचीं प्रेतें बर्फातून उकरून काढून, त्यांनीं घेतलेलीं फोटो व टिपणें हस्तगत करून, त्य चें और्ध्वदैहिक उरकून तो स्वदेशी गेला.

हिमालयाच्या इतर शिख रांच्या आरोहणासाठीं असे प्रयत्न चालू असतां माणसाच्या मर्दुमकीला मुख्य आव्हान गौरीशिखराचेंच आहे. मौन्ट एवरेस्टवर निशाण लावण्याचे आजपर्यंत सात आठ प्रयत्न झाले. प्रथम १९२१ त मॅलोरी या विख्यात गिर्यारोहणपटूनें २३००० फुटांपर्यंत चढू

नुसती वाटेची पहाणी केली. पुढील वर्षी ब्रूस मोहिमेंतल्या मॅलोरी व नॉर्टन या जवानांनीं २७००० फूट उंची गांठली. नंतर (१९२४) सालच्या प्रयत्नांत नॉर्टन व सोमरव्हील २८००० फूटापर्यंत पोहोंचले होते. पण या मोहिमेंतच मॅलोरी हा उमदा गडी आयर्व्हिन् नांवाच्या जोडीदारासह घसरून कायमचा नाहींसा झाला.

येथपर्यंतच्या अनुभवानंतर तेहतीस सालची तयारी फारच कसोशीनें करण्यांत आली. लंडनमध्यें अल्पाइन क्लब व रॉयल–जिऑग्रॅफिकल सोसायटी या संस्थांच्या सहकार्यानें 'एव्हरेस्ट कमिटी' स्थापन झाली. ह्या समितीनें लोक निवडून रटलेज याच्या नेतृत्वाखालीं गौरीशिखरावर चौथा हल्ला केला. कमेत जिंकणाऱ्या स्मिथसारखी पुष्कळ अनुभविक मंडळी या वेळच्या तुकडीत होती. या खेपेस वेजर व स्मिथ हे दोघेही स्वतंत्रपणें गौरीशिखरांपासून अगदीं जवळ म्हणजे सात आठशें फुटांच्या आसपास जाऊन आले. पण त्या वेळीं शिखरापर्यंत पोहोंचण्यास परिस्थिति अनुकूल मिळाली नाहीं. या वेळींच २७४०० फूट उंचीवर सहावा तळ देण्याचा विक्रम करण्यांत आला. त्या रात्रीं मनुष्यप्राण्यानें आपला बिछाना पृथ्वीवरच्या उंचांत उंच ठिकाणीं पसरला. १९३४ मध्यें विल्सन नांवाचा एक अमेरिकन तरुण तिबेटकडून विमानानें आला. चार हेलकरी घेऊन एकवीस हजार फूट उंचीपर्यंत गेला आणि पुढें एक-

टाच निघून जाऊन नाहींसा झाला! १९३५ सालीं गौरी-शिखराची आणखी एक पाहणी झाली. त्यानंतर लौकरच लेडी हूस्टन या इंग्रज बाईनें खर्च देऊन एव्हरेस्टची विमानांतून पाहणी व नोंद ( Photographic Survey ) करवली. १९३८ सालीं स्मिथ, ऑडेल, शिप्टन वगैरे अनुभविक लोकांच्या पथकानें गौरीशिखराला आणखी एकवार वेढा दिला; पण प्रतिकूल हवामानामुळें त्यांना पुन्हां परत फिरावें लागलें. यावेळीं एकवीस हजार फूट उंचीवरच्या तिसऱ्या छावणीपर्यंत बिनतारी दळणवळणाची व तेथून त्याही पुढच्या चौथ्या छावणीपर्यंत टेलिफोनची व्यवस्था करण्यांत आली होती. उंचीवरच्या विरळ हवेचा श्वासोश्वसाला त्रास होतो. म्हणून बरोबर ऑक्सिजन ( प्राणवायु ) ची टांकी नेण्याचे प्रयत्न अगोदरच सुरू झाले होते, पण तें लटांबर त्रासदायक झाल्यामुळें ऑक्सिजनची कल्पना तात्पुरती तरी बाजूला ठेवण्यांत आली.

समुद्रसपाटीपासून पांच मैल उंचीपर्यंत चढून जाण्यासाठीं तयारीहि तशीच लागते. कैलासमानसापर्यंत जाण्यास कणखर अंगकाठी, थंडीपासून भरपूर निवारण, खाण्यापिण्याची सोय आणि विश्रांतीसाठीं आसरा, इतकी तयारी पुरते; पण कैलास–मानसाच्यापेक्षां दोन मैल उंचावर जाणारांना, पृथ्वीप्रदक्षिणेला लागणार नाहीं, इतकी व्यवस्था करावी लागते. आकाशांत चार मैलांपर्यंत आपले ‘ शरपा

जातीचे पहाडी लोक व भूतानचे ' भूतिये ' अंगांत नुसतें एक कुडतें घालून, खाद्यांपासूनचे हात व गुढग्याखालचें पाय उघडे टाकून खुशाल ओझीं वाहून नेतात! पण त्याहून वर जाण्यास त्या लोकांनाही कपड्यांची जरूर लागतेच. निष्ठुर, कठोर सुळक्यांतुन, थेट हाडांत शिरून बसणाऱ्या थंडीतून, बर्फाच्या त्या भयंकर खाईतून, दर पावलाला विरळ होणाऱ्या हवेंतून, एकसारखें जिवाला सांभाळींत ' वर, वर ' चढत जायचें, या उग्र व्रतासाठीं अगोदर मोठीच सिद्धता करून ठेवावी लागते. माणसें निवडण्यापासून सुरुवात करावी लागते. टणक आणि दमदार असे मर्द लोक जमा करावयाचे असतात. आपले शरपा व भूतिये लोक डोंगर चढणारे बांके खरे. पण सध्यां ते नुसते वाटाड्ये नी हेलकरीच आहेत; एकाद्या शिखरावर स्वतंत्रपणें मोहीम नेऊन आपला बावटा लावण्याची कल्पना त्यांना अजून आली नाहीं; त्यांची मदत मात्र अतिशय होते, हें प्रत्येक वेळीं सिद्ध झालें आहे. कोणत्याहि शिखरावर स्वारी करण्याचे ठरलें म्हणजे या मदतगारांखेरीज, कांहीं अनुभविक माहितगार आणि खंबीर लोकांची एक सुटसुटीत टोळी गोळा करावयाची, तिचा एक पुढारी निवडावयाचा व त्याच्या आज्ञेची शिस्त सर्वांनीं पाळायची, असा प्रघात आहे. युरोपिअन लोकांना बर्फाचे डोंगर चढण्याचा बराच सराव असल्यामुळें त्यांच्या तिकडचें सामान्य आरोहणतंत्र दसपटीनें गुणून

हिमालयाच्या मोहिमेंत उपयोगांत आणतात. थंडीसाठीं सामान्य गरम कपड्याच्या कित्येक पट जाडीचे अनेक लोंकरी व कातडी कपडे, खिळ्यांचें बूट, अणकुचीदार कांब्या, डोळ्यांच्या संरक्षणासाठीं काळ्या भिंगांच्या झांपडा, बर्फ फोडण्यासाठीं कुऱ्हाडी, प्रत्येकाजवळ पांचपन्नास वार मजबूत दोरी, डब्यांतले अन्नपदार्थ, स्टोव्ह, गरम पेयांसाठीं थर्मासचे शिसे, हलके तंबू, शास्त्रीय उपकरणें, कॅमेरे, दुर्बिणी, रेडिओ, टेलिफोन इत्यादि यंत्रसामुग्री, वेळप्रसंगीं ऑक्सिजनची टांकी—अशा प्रकारची चतुरंग तयारी आज हिमालयाच्या प्रथमश्रेणीच्या शिखरावर चढण्यासाठीं करावी लागते. यूरोपांतील आल्प्सची शिखरें एकाद्या चांगल्या हॉटेलपासून एकेक किंवा दोन दोन दिवसांच्या अवधींत चढून जातां येतात; व त्यांसाठीं दोन वाटाडे पुरे होतात. हिमालयाचे मुख्य शिखरांपैकीं एकाद्यावर चढणें झाल्यास कधीं कधीं पन्नासांपर्यंत मदतनीस व हेलकरी बरोबर घेऊन, एकंदर महिन्याच्या प्रवासाची तयारी ठेवावी लागते. तरीपण आल्प्सच्या शाळेंत शिकलेल्या विद्यार्थ्यांनींच हिमालयाच्या वाटा मळवून ठेवल्या आहेत. जिवावर उदार होऊन आजवर असलीं बिकट कामें करीत आलेले लोक मुख्यतः ब्रिटिश व जर्मन होते. ब्रिटिशांनीं हिमालयावरचे आपले अनेक लोकोत्तर प्रयत्न, 'डाव टाकून पाहूं, साधला तर साधला' या खिलाडू वृत्तीनें केले; उलट 'एकाहि गोष्टीची

उणीव न ठेवता अचूक तयारी करायची आणि शिखर गांठ ल्याशिवाय परत फिरावयाचें नाहीं.' या तीव्र ईर्षेनें जर्मन जवानांनीं हिमालयावर आपले दोन दुर्दैवी हल्ले केले. त्यांनीं मर्दुमकीची कमाल केली, वाटेनें तें बर्फांतून रस्ते फोडीत गेले, तंबूंचें ओझें नको म्हणून त्यांनीं बर्फांतच गुहा खणल्या, आणि गुहांतून आपआपल्या 'नीज-पिशव्या' [ Sleeping bags ] मध्यें कित्येक काळरात्रीं घालवल्या !

एकाद्या शिखराकडे मोर्चा वळवला, म्हणजे मनुष्यवस्तीपासून अगदीं वरच्या टोंकापर्यंत शक्य तितके थोडे टप्पे करीत जाऊन परत यायचें, अशी चढणारांची सामान्य पद्धत असते. हें टप्पे किंवा तळ सहा सातपर्यंत होतात. प्रत्येक तळ म्हणजे एका रात्रीची विश्रांती; दर तळाला सामान व माणसें कमी होत जातात; अगदीं शिखराजवळच्या टप्याला एक दोनच काटक व ताजेतवानें उरलेले लोक पुढें जातात; एक रात्र विश्रांति घेतात; दुसऱ्या दिवशीं शिखरापर्यंत शेवटचा टप्पा करून येण्याची शिकस्त करतात; प्रयत्न झाला किंवा न झाला तरी वर अधिक वस्ती करणें शक्य नसल्यामुळें ते खालच्या तळाला उतरून येतात, सर्वांनीं सुखरूपपणें खालीं येण्याचें बाबतींत वर चढण्याइतकीच दक्षता घ्यावी लागते.

पंचवीस हजार फूट उंचीनंतर चढण्याचा वेग तासाला चारशें फुटापेक्षां जास्त राहात नाहीं. कधीं पुढें सरळ उभी बर्फाची भिंत व तिला पायऱ्या खोदून चढून जाण्याची जिवा



पाड मेहेनत, तर कधीं बाजूला निसरडा उतार नी खालीं हजार पंधराशें फूट खोल दरी, कधीं एकाद्या हिमनदींतून मांडी-इतक्या बर्फाच्या खांचामधून वाटचाल, तर कधीं दोरीनें बांधलेल्या तिघाचौघांच्या लटांबराची लळतलोंबत पायढकल ही तेथील डोंगर चढण्याची तऱ्हा! भोंवतालीं राक्षसी थंडी, पिशाचांसारखा पिंगा घालणारी तुफानें, वाळूसारख्या बर्फाचा सर्वबाजूंनीं मारा, अंगावर कपड्यांचें असह्य ओझें, हवेसाठीं कंठाशीं आलेलें प्राण, आणि इतक्या त्रासानें सुन्न झालेलें डोकें ही चढणाराची अवस्था.

समुद्रापासून आकाशांत पांच मैलावर गेल्यानतर हलक-

त्यांना देखील पांच शेराच्यावर वजन वाहण्याची मुष्कली होते! अर्धवट उन्मादांत असल्याप्रमाणें एकामागें दुसऱ्यानें असें पाऊल टाकीत राहायचें; पुन्हां पुढचें पाऊल उचलून टाकल्यावर पांच सहा दम घ्यावयाचें, पुन्हां पुढचें पाऊल. मान वर करण्याचीहि उमेद वाटत नाहीं. पायांखालच्या मऊ हिमशय्येंत लोळण घ्यावी, सारे श्रम कायमचे विसरून जावे, पुन्हां उठूंच नये, हा एकीकडे मोह होत असतो. आणि बहादुरीची सारी कसोटी हा मोह मारण्यांत असते. एकमेकांच्या सोबतीनें वस्तुस्थितीची सारखी आठवण राहतें म्हणून ठीक; नाहींतर त्या थंडीच्या भडक्यांत डोकें ठिकाणावर राहण्याची शाश्वतीच नाहीं!

हिमालयाच्या शिखरावर थोडा वेळ उभा राहून येण्यासाठीं मनुष्यप्राणी इतकी जिवापाड धडपड कां करतो? कीर्तीसाठीं खास नव्हे. साडे पांच मैल आकाशांत शिरल्यानंतर कीर्तिबिर्तीची पर्वाच उरत नाहीं, इतका जीव नकोसा होतो! वैयक्तिक पराक्रम गाजवण्याच्या हौसेनेंहि मनुष्य इतक्या हालअपेष्टा सोशीत नाहीं. स्मिथच्या तुकडीनें कमेत' शिखर जिंकलें तेव्हां स्मिथनें कमेतच्या ऐन टोंकाला निव्वळ खेळाडूपणानें आपला हेलकरी लेवा यांस पुढें घातलें. व याप्रमाणें हिमालयाच्या या औरस पुत्राचेंच पाय तेथें अगोदर लागूं दिले! हिमालयाच्या शिखरावर चढण्यासाठीं मनुष्य दारुण यातना सोसतो, विलक्षण धोका पत्करतो व

जिवावर पूर्णपणें उदार होतो, तो कांहीं लाभाच्या हेतूनें नव्हे!

पर्वताचें आव्हान स्वीकारून मनुष्यप्राणी त्याला झुंज देण्यास कां उभा राहतो, याचें थोडक्यांत उत्तर हिमालयाचा एक निस्सीम भक्त सर फ्रान्सिस यंगहस्बंड यानें दिलें आहे. तो म्हणतो, “ हिमालयासारखा पर्वत माणसाचे सारे अस्सल गुण कसोटीला लावतो. शिखरें चढणाराला निकोप प्रकृति, तरतरीत बुद्धि व वज्रासारखें खंबीर मन या गुणांची जरूरी लागते. माणसाच्या ताकदीची, युक्तीची आणि निग्रहाची हिमालय कठोर परीक्षा घेतो. त्याच्या हिमदिव्यांतून तावूनसुलाखून निघालेल्या माणसाला स्वतःच्या गुणाचा कस मिळतो. ” हिमालयाच्यापुढें मर्दपणाची अशी परीक्षा द्यायला सातासमुद्रांपलीकडून अनेक जवान येऊन गेलें; कोणी बेसावधपणाला, तर कोणी हिमलाटेसारख्या दैवगतीला बळी पडले. कोणी पराजय पावून माघारे गेले, तर क्वचित् एकाद्यानें हिमालयाला आपले गुण पटवून विजयपताका मिळवली. हिमालय सर्वांच्या प्रयत्नाकडे कौतुकानें पाहात आहे; आणि गौरीशिखर नव्या वीरांची वाट पहात आहे.

एक दिवस मनुष्यप्राण्याचे हात गौरीशिखराला पोहोंचतील! निसर्गाचे बरेचसे पण माणसानें जिंकून दाखविले आहेत. उरलेल्या पणांत गौरीशिखर चढणें हा एक शिल्लक

आहे. एक दिवस मनुष्यप्राणी तोहि पण जिंकील. एका वर्षी मे–जूनच्या दरम्यान पंधरा दिवस अनुकूल हवामान मिळेल, निवडक पहाडी शिपाईगड्यांचें एक सुसज्ज पथक गौरीशिखराकडे मोर्चा वळवील, उंचावरच्या हवेची संवय करीत, त्यांची टोळी वरवर एकेक तळ ठोकीत जाईल; टोंका पासून पांचशें फुटांच्या आंतच शेवटच्या एकदोन लोकांचा सहावा किंवा सातवा तळ पडेल. तेथून एका सकाळीं निघून दोघांतला एकजण तरी गौरीशिखरापर्यंत सरपटत जाऊन तेथें तास दोन तास उभा राहून येईल. जो कोणी असेल तो असेल, मर्द असेल तो हें मात्र नक्की. त्याची मर्दुमकी त्या बर्फा-च्या भट्टींतच पारखून निघालेली असेल, आणि तो जवान जर खुद्द हिमालयाच्या पुत्रांपैकींच एखादा असेल; तर हिमालयालाहि धन्यता वाटेल !

---

# जगांतील कांहीं आंकडेवार तपशील.

आलपस्–(यूरोप) सर्वोच्च शिखर–मॉन्त ब्लांक उंची

१५७८०

| | |
|---|---|
| रॉकीज ( उ. अमेरिका ) ,, —मॅकिन्ले–उंची | २१००० |
| ॲन्दिज ( द. अमेरिका ) ,, —सारोता– ,, | २५२५० |

मानस सरोवर—जगांतील सर्वांत उंचावरचें तळें

१६९४६

हिमालयांतलें कांहीं घाट–रस्ते

| | |
|---|---|
| बाराघेले ( कालगरकडे ) | १२५०० |
| मुझताघ–काराकोरम, यार्कंद व खोतानकडे | १८,१९००० |
| सतलज ( गर्तोककडे ) | १७००० |
| जनसंगला ( तिबेटकडे ) | १७००० |

जगांतिल सर्वांत उंचावरची सोन्याची खाण—

टोकजलंग १६३४०

| | | |
|---|---|---|
| प्रथम श्रेणीचीं कांहीं शिखरें | गौरीशिखर | २९१४० |
| | कांचनगंगा | २८२२५ |
| | दापसाँग ( k 2 ) | २८१९१ |
| | मकालू | २७८०० |

| | |
|---|---|
| धवलागिरी | २६७९५ |
| नंगापर्वत | २६६२९० |
| गोसाईस्थान | २६२९० |
| नंदादेवी | २५६४५ |
| राकापुली | २५५६० |
| कमेत | २५४४७ |
| तीरचमीर | २५४०० |
| गुरुमांधाता | २५३५३ |
| कैलास | २२०२८ |
| त्रिशूल | २३४०६ |
| चुमल्हारी | २३९३० |

११४५०

## — आमचें बाल वाङ्मय —

| | |
|---|---|
| स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ<br>शि. म. परांजपे | ०-१२-० |
| ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला<br>शि. म. परांजपे | १-०-० |
| अमोल गोष्टी<br>साने गुरुजी | १-८-० |
| इसाप नीति, पूर्वार्ध भाग १ | ०-१-० |
| भाग २ | ०-१-० |
| पोपटपंची | ०-६-० |
| गुलाब अंगठी | ०-६-० |
| मोहन | १-४-० |
| नीलचंद्र आणि निनाद | ०-६-० |

आणि इतर अनेक प्रकारचे बाल वांङ्मयाचा भरपूर साठा आमचेकडे नेहमीं असतो.

आजच कार्ड टाकून कॅटलॉग मागवा.

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग, पुणें २.

म.ग्रं.सं. ठाणे.

एकमेव विक्रेते :
चित्रशाळा प्रेस,
प्रकाशन-विभाग,
पुणें २

किंमत दहा आणे

म. ग्रं. सं. ठाणें.

IRBK-0111950


## आमचें नवें बालवाङ्मय

| | |
|---|---|
| स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ (शि. म. परांजपे) | १२ आणे |
| ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला (शि. म. परांजपे) | १ रु. |
| मोहन | १। रु. |
| पोपटपंची | ६ आणे |
| गुलाब अंगठी | ६ आणे |
| नीलचंद्र निनाद | ६ आणे |

चित्रशाळा प्रकाशन